पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३३/२०१९
दिनांक : १८/०१/२०२०

प्रति,

मा......................................
सदस्य, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा दिनांक **२४/०१/२०२०** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२४/०१/२०२०** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १३**

**दिनांक : २४/०१/२०२०** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२४/०१/२०२०** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस र.रु.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. कु.श्रेया शंकर कंधारे, निगडी, पुणे ४४ हीने ९ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१९ येसू (साऊथ कोरीया) येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे तीला र.रू.२,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२ दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, क्रीडा धोरणतील अट क्र.२३ मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१८-१९ चे लाभार्थी १४ खेळाडूंना त्यांच्या प्राविण्या बाबत संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता ८ खेळाडू पात्र व ४ खेळाडू उर्वरीत २ खेळाडूपैकी १ खेळाडूला नोकरी लागले कारणाने अर्ज दाखल केलेला नाही व दुसरा खेळाडूस दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता त्याने प्राविण्य नही म्हणून अर्ज सादर करणार नाही असे सांगितले. असा अहवाल क्रीडा विभागाला दिलेला आहे. ८ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१९ -२० चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी येणा-या खर्चास र.रू.१९,७८,४००/- (अक्षरी र.रु.एकोणीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार चारशे फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३३/२०२०
दिनांक : १/०१/२०२० चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.